## अंबरनाथ नगरपरिषद आयोजित वर्षा मॅरेथॉन स्पर्धा तथा स्वच्छता दौड 2016 - दि.03/09/2016

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अंबरनाथ नगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यांत आलेल्या वर्षा मॅरेथॉन तथा स्वच्छता दौड मध्ये विद्यार्थी व खुल्या गटामध्ये 2500 स्पर्धक सहभागी होऊन धावले. या स्पर्धेत वयोगट 10 ते 12 , 12 ते 14, 14 ते 16, खुला गट, नगरसेवक व अधिकारी गट आणि ज्येष्ठ नागरिक गट, पुरुष महिला गटामधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता.




ही स्पर्धा कल्याण-बदलापूर रस्ता, हुतात्मा चौक ते शिवाजी चौक, आणि शिवगंगा चौक ते स्वामी समर्थ चौक दरम्यान घेण्यांत आली. यामध्ये 12 वर्षाखालील मुलांमध्ये गुरुकुल शाळेच्या मोनेश वाघ याने प्रथम क्रमांक तर मुलींमध्ये एकता गावडे प्रथम आली. 14 वर्षाखालील मुलांमध्ये हसन महंमद आणि मुलींमध्ये गुरुकुल शाळेच्या किरण पवार हिने प्रथम क्रमांक पटकावला. 16 वर्षाखालील वयोगटातील स्पर्धेत गुरुकुल शाळेच्या पप्पू वाघे आणि श्री श्रध्दा हिंदी महाविद्यालयाची प्रीती यादव हिने प्रथम क्रमांक मिळवला. पुरुष खुल्या गटामध्ये अनिल कोरवी यांनी प्रथम क्रमांक तर महिला खुल्या गटामध्ये उमेश्वरी गवळी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. नगरसेवक, पालिका अधिकारी यांच्यामध्ये नगरसेवक निखिल वाळेकर यांनी पहिला येण्याचा मान पटकाविला.





सदर स्वच्छता दौड पारितोषिक वितरण सोहळ्यात सहा. पोलीस आयुक्त दिलीप जगताप, सेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर, भाजपाचे शहराध्यक्ष भरत फुलोरे, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष प्रदिप पाटील, बाळा चव्हाण यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना पारितोषिके देण्यांत आली.

दरम्यान उपस्थितांना, नागरिकांना मुख्याधिकारी श्री.गणेश देशमुख यांनी अंबरनाथ शहर कचरामुक्त, हागणदारी मुक्त व शहर स्वच्छ राखण्याची शपथ देऊन सर्वांना वचनबध्द केले.





या स्वच्छता दौड स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरीता नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, मा.नगरसेवक, पोलीस कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले होते.